## प्रेस नोट

जा.क्र. १३१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०३/२०१८

## भंडारा जिल्हा पोलीस भरती –२०१८

भंडारा:– पोलीस शिपाई भरती २०१८ दिनांक १२/०३/२०१८ रोजी सकाळी ५.०० वाजता पासुन सुरु झाली आहे. पोलीस मुख्यालय भंडारा पोलीस मैदानावर सुरु झाली आहे. मा.पोलीस अधिक्षक भंडारा श्रीमती विनीता साहू यांच्या मार्गदर्शनात सदर भरती प्रकीया घेण्यात येत आहे. शारीरीक चाचणी घेणे सुरु झाली आहे. पुरुष करीता लांब उडी, १०० मिटर धावणे, १६०० मीटर, गोळाफेक व पुलअॅप्स याची चाचणी घेण्यात येत आहे.

या भरतीवर करडी नजर ठेवण्यासाठी २६ व्हिडीओ कॅमेरे व्हिडीओ ग्रॉफी करीता बसविण्यात आलेले आहे. १२ उत्तीर्ण ही या भरती प्रकीयेची शैक्षणिक पात्रता आहे. सदर भरती मध्ये एकुण ४२८ उमेदवारांनी हजर होवुन भरती प्रकियेत सहभाग घेतला.

सदर पोलीस भरती प्रकीये साठी १ पोलीस अधिक्षक, १ अपर पोलीस अधिक्षक, ६ उपविभागीय पोलीस अधिकारी, १७ पोलीस निरीक्षक, १५ सहायक पोलीस निरीक्षक, ३२ पोलीस उपनिरीक्षक, ३९१ पोलीस कर्मचारी तसेच लिपीक वर्गातील कर्मचारी सहभागी झाले आहेत.

१२.३

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.